AC – 20/05/2025

Item No. – 5.50 (N) Sem-IV 4(c)

**As Per NEP 2020**

# University of Mumbai

| | |
|---|---|
| **Syllabus for<br>Basket of Marathi - OE<br>Vertical 3** | |
| **Faculty of Arts** | |
| **Board of Studies in Marathi** | |
| **Second Year Programme** | |
| **Semester** | **IV** |
| **Title of Paper** | **Credits** |
| सर्जनशील लेखन : काव्य आणि ललित गद्य लेखन | 2 |
| **From the Academic Year** | **2025-26** |

**Syllabus**
**B.A. (Marathi - OE)**
**(Semester- IV)**

**Title of Paper : सर्जनशील लेखन : काव्य आणि ललित गद्य लेखन**

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | **अभ्यासक्रमाचे वर्णन** **(Description of the Course) :** | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० चे आंतरविद्याशाखीय उद्दिष्ट लक्षात घेऊन, **मुक्त वैकल्पिक (Open Elective)** या स्तंभांतर्गत **चौथ्या** सत्रासाठी मराठी विषयाच्या **'सर्जनशील लेखन : काव्य आणि ललित गद्य लेखन' (श्रेयांकने २ )** या अभ्यासपत्रिकेची आखणी करण्यात आली आहे. **M1 आणि M1-M2** या प्रारूपांतर्गत अध्ययन करणाऱ्या सामाजिक शास्त्र (Social Science) व विज्ञान (Science) विद्याशाखांमधील विद्यार्थ्यांनी सदर अभ्यासपत्रिकेचे अध्ययन करणे अपेक्षित आहे. वाणिज्य (Commerce) विद्याशाखेतील विद्यार्थीही या अभ्यासपत्रिकेचे अध्ययन करू शकतात.<br>सर्जनशील लेखन ही एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया समजून घेण्यासाठी सर्जनशील लेखन ही संकल्पना, साहित्याचे प्रकार, उपप्रकार आणि त्यांच्याशी निगडित लेखनसंकेतांचा परिचय करून घेणे आवश्यक असते. हे लक्षात घेऊन सदर अभ्यासपत्रिकेमध्ये अभ्यासघटकांचा समावेश करण्यात आला आहे.<br>**'सर्जनशील लेखन : काव्य आणि ललित गद्य लेखन' (श्रेयांकने २)** या अभ्यासपत्रिकेतील पहिल्या घटकात सर्जनशील लेखन ही संकल्पना व तिचे स्वरूपविशेष समजून घेणे अपेक्षित आहे. या घटकाच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांना सर्जनशील लेखनप्रक्रियेची व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमतांची ओळख होईल. या अभ्यासपत्रिकेतील दुसरा घटक काव्य आणि ललित गद्य लेखनाची सर्जनशील प्रक्रिया उलगडून दाखवणारा आहे. या अभ्यासपत्रिकेच्या अध्ययनातून प्रत्यक्ष सर्जनशील लेखन करण्याकरिता आवश्यक असणाऱ्या क्षमता विकसित करण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल. |
| 2 | **Vertical :** | Open Elective |
| 3 | **Type :** | Theory |
| 4 | **Credit :** | 2 Credits (1 Credit = 15 Hours for Theory or 30 Hours of Practical Work in a Semester) |
| 5 | **Hours Allotted :** | 60 Hours |
| 6 | **Marks Allotted :** | 100 Marks |

| | | |
|---|---|---|
| 7 | **अभ्यासक्रम उद्दिष्टे (Course Objectives) :**<br>१. सर्जनशील लेखन या संकल्पनेचा परिचय करून देणे.<br>२. सर्जनशील लेखनप्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट करणे.<br>३. काव्य आणि ललित गद्य लेखनाची सर्जनशील प्रक्रिया समजावून सांगणे.<br>४. प्रत्यक्ष सर्जनशील लेखनास आवश्यक असणाऱ्या क्षमता विकसित करणे. |
| 8 | **अभ्यासक्रम निष्पत्ती (Course Outcomes) :**<br>१. विद्यार्थ्यांना सर्जनशील लेखन या संकल्पनेचा परिचय होईल.<br>२. विद्यार्थ्यांना सर्जनशील लेखनप्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट होईल.<br>३. विद्यार्थ्यांना काव्य आणि ललित गद्य लेखनाची सर्जनशील प्रक्रिया समजेल.<br>४. विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष सर्जनशील लेखनास आवश्यक असणाऱ्या क्षमता विकसित होतील. |
| 9 | **अभ्यासक्रम घटक (Modules) :** |
| | **घटक १ : सर्जनशील लेखन : संकल्पना व प्रक्रिया** |
| | अ) सर्जनशील लेखन : संकल्पना विचार<br>आ) सर्जनशील लेखनप्रक्रिया : स्वरूपविशेष<br>(६० मिनिटांच्या एकूण १५ तासिका, श्रेयांकन १) |
| | **घटक २ : सर्जनशील लेखनप्रक्रिया : काव्य व ललित गद्य यांच्या संदर्भात** |
| | अ) काव्यलेखन : सर्जनशील प्रक्रिया<br>आ) ललित गद्यलेखन : सर्जनशील प्रक्रिया<br>(सूचना : शिक्षकांनी सर्जनशील लेखनप्रक्रिया समजावून सांगताना विषयसूत्र देऊन काव्य आणि ललित गद्य यांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.)<br>(६० मिनिटांच्या एकूण १५ तासिका, श्रेयांकन १) |
| 10 | **पाठ्य ग्रंथ (Text Books) : N.A.** |
| 11 | **संदर्भ ग्रंथ (Reference Books) :**<br>१. *सृजनात्मक लेखन,* आनंद पाटील, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००५.<br>२. *साहित्य : अध्यापन आणि प्रकार (वा.ल. कुलकर्णी गौरवग्रंथ),* (संपा.) श्री. पु. भागवत व अन्य, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८७.<br>३. *भाषिक सर्जनशीलता : स्वरूप आणि प्रकार,* एकनाथ पगार, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन, नाशिक, २०००.<br>४. *कवितेविषयी,* वसंत आबाजी डहाके, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, १९९९.<br>५. *सर्जन प्रेरणा आणि कवित्वशोध,* म. सु. पाटील, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०१३.<br>६. *प्रतिभा आणि सर्जनशीलता,* सुधाकर देशमुख, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१६. |

| | | |
|---|---|---|
| **12** | **Internal Continuous Assessment: 40%** | **External, Semester End Examination : 60%**<br>**Individual Passing in Internal and External Examination** |
| **13** | **अंतर्गत सातत्यपूर्ण मूल्यांकन (Internal Continuous Assessment) : २० गुण**<br>**अंतर्गत मूल्यांकनाचे स्वरूप (Format of Internal Assessment) :**<br>चाचणी परीक्षा / मौखिक परीक्षा / प्रकल्पलेखन / नियतकार्य (Assignment) / सादरीकरण / प्रश्नमंजूषा यांपैकी कोणत्याही पद्धतींचा अवलंब करून अंतर्गत मूल्यमापन करता येईल.<br>(प्रत्यक्ष उपस्थिती किंवा ऑनलाईन) | |
| **14** | **बहिर्गत परीक्षा (External Examination) : ३० गुण (वेळ : एक तास)**<br>**बहिर्गत परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप (Format of Question Paper) :**<br>१. प्रत्येकी **१५** गुणांचे एकूण **तीन** प्रश्न विचारावेत. त्यापैकी विद्यार्थ्यांनी कोणतेही **दोन** प्रश्न सोडवावेत.<br>२. पहिले **दोन** प्रश्न दीर्घोत्तरी स्वरूपाचे असावेत. दोन्ही घटकांवर आधारित **१५** गुणांचे अंतर्गत पर्याय असलेले **दोन** प्रश्न विचारावेत.<br>३. **तिसरा** प्रश्न हा घटक क्रमांक एक व दोनवर आधारित **१५** गुणांचा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. प्रत्येक घटकावर **दहा** याप्रमाणे एकूण **वीस** वस्तुनिष्ठ प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांनी कोणतेही **पंधरा** प्रश्न सोडवावेत. | |

| Sd/- | Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|---|
| **Sign of BOS Chairman**<br>**Dr. Satish Kamat**<br>**Board of Studies in Marathi** | **Sign of the Offg. Associate Dean**<br>**Dr. Suchitra Naik**<br>**Faculty of Humanities** | **Sign of the Offg. Associate Dean**<br>**Dr. Manisha Karne**<br>**Faculty of Humanities** | **Sign of the Dean**<br>**Prof. Dr. Anil Singh**<br>**Faculty of Humanities** |